


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुद्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

वर्ष ५ । अंक १६० । बुधवार ११ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## प्रलंबित इ-चलान भरण्यासाठी जबरदस्ती केल्यास होणार शिस्तभंगाची कारवाई

### अपर पोलीस महासंचालकांचे वाहतूक पोलीस व अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वाहनचालकांना प्रलंबित ई-चलानचा दंड भरून घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची जबरदस्ती अथवा पैशांची अवैध मागणी करण्यात येऊ नये. तसेच वाहनचालकांशी सौजन्याने वागावे, असे स्पष्ट निर्देश वाहतूक पोलीस अधिकारी व अंमलदारांना देण्यात आले आहेत. ई-चलान दंड वसुलीबाबत जारी केलेल्या परिपत्रकाचे पालन करण्यास कसूर करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांविरुद्ध शिस्तभंगात्मक कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना राज्याचे अपर पोलीस महासंचालक प्रवीण साळुंके यांनी दिल्या आहेत.

राज्यातील विविध वाहतूकदार संघटनांच्या प्रतिनिधींची परिवहन मंत्री यांच्यासमवेत झालेल्या बैठकीमध्ये ई-चलानबाबत उपस्थित केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने हे निर्देश देण्यात आले आहेत.

ई-चलानच्या प्रलंबित दंड वसुली व वाहन जप्तीच्या कारवाईच्या बाबतीत आदर्श कार्यप्रणालीचे परिपत्रक जारी करण्यात आलेले असून त्यामध्ये ई-चलान केसेसच्या तडजोड शुल्काची रक्कम वाहनचालक हे स्वेच्छेने भरण्यास तयार असतील, तरच ती भरणा करून घ्यावी तसेच वाहन जप्तीची कार्यवाही ही न्यायालयाच्या आदेशानेच करावी, असे स्पष्ट निर्देश परिपत्रकात देण्यात आलेले आहेत. परंतु वाहतूक पोलीस व अधिकारी या परिपत्रकाचे पालन करत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त होत असल्याने जनमानसात पोलिसांची प्रतिमा मलीन होत असल्याचेही या आदेशात म्हटले आहे.

**जबरदस्ती, पैशांच्या मागणीच्या वाहतूक पोलिसांविरोधात तक्रारी**

**परिवहनमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीत विविध वाहतूकदार संघटनांच्या प्रतिनिधींनी वाहतूक पोलीस हे रस्त्यावर अनावश्यक चालत्या वाहनांना रस्त्याच्या बाजूला थांबविता व त्यांच्याकडून जबरदस्तीने प्रलंबित ई-चलान दंड भरून घेतात. त्याकरिता वाहन दीर्घकाळ थांबवून ठेवतात. दंडाची रक्कम न भरल्यास पैशांची मागणी करतात. तसेच चालकांना वाहन व/ कागदपत्रे जप्त करू अशी दमदाटी करून वाहनचालकांशी उध्दट पध्दतीने वागतात. अशा प्रकारे वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांना नाहक त्रास दिला जातो असा मुद्दा उपस्थित करून वाहतूक पोलिसांबाबत तक्रारी करण्यात आल्या. यावेळी परिवहन मंत्र्यांनी पोलिसांच्या अशा वर्तनाबाबत नाराजी व्यक्त केली.**

## रामनवमी मिरवणुकीसाठी रात्री बारा वाजेपर्यंतची परवानगी द्यावी

### सकल हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रामनवमी मिरवणुकीसाठी रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी देण्यात यावी सकल हिंदुत्ववादी श्रीराम भक्त कार्यकर्त्यांची मागणी भारत देश हिंदू धर्माच्या संस्कृतीवर आणि परंपरेवर आधारलेला असून प्रभू श्रीराम हे भारत भूमीचे आद्यपुरुष आहेत त्यांचा जन्म उत्सव आणि जयंतीचा उत्सव साजरा करताना मिरवणुकीला व चौका चौकातील मंडळांना रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी देण्यात यावी अशी मागणी सकल हिंदुत्ववादी ■ पान ४ वर

## वकिलांनी दाव्यांचा सखोल अभ्यास करून नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा - धर्मादाय उपआयुक्त एन. व्ही. जगताप

### न्यू लॉ कॉलेजमध्ये 'खटलापूर्व पूर्वतयारी' एकदिवसीय कार्यशाळेचा समारोप




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वकिलांनी आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक दाव्याचा बारकाईने अभ्यास करून कायद्याचे ज्ञान आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार न्यायव्यवस्थेत नवनवीन तंत्रज्ञानाच्या संकल्पनांचा स्वीकार करून कामकाज अधिक प्रभावीपणे करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन धर्मादाय उपआयुक्त एन. व्ही. जगताप यांनी केले.

येथील न्यू लॉ कॉलेज आयोजित 'खटलापूर्व पूर्वतयारी' या एकदिवसीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे, प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, समन्वयक प्रा. डॉ. अतुल मोरे तसेच प्रा. विजयकुमार शिंदे उपस्थित होते.

जगताप पुढे म्हणाले की, वकिलांनी सातत्याने वाचन करून कायद्याचा सखोल अभ्यास केला पाहिजे. प्रत्येक दाव्याचे सूक्ष्म परीक्षण करून आपल्या अशिलाला न्याय मिळवून देणे हे वकिलांचे प्रमुख कर्तव्य आहे. न्यायालयीन प्रक्रियेत योग्य तयारी आणि कायद्याचे भक्कम ज्ञान असल्यास यशस्वी वकिली करता येते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे म्हणाले की, कायदे अनेक असले तरी त्यांचे योग्य विश्लेषण करणे हे वकील आणि ■ पान ४ वर

## चापडगावात अफूचे पीक घेणारा गजाआड

### एलसीबीच्या कारवाईत ४७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कर्जत तालुक्यातील चापडगाव येथे प्रतिबंधित अफूची शेती करणा-या आरोपीस स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले आहे. परमेश्वर बन्सी घनवट (वय- ६८ वर्षे रा. चापडगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या ताब्यातून ४७ लाख ६४ हजार १८० रुपये किमतीची अफूची झाडे जप्त करण्यात आली आहेत.

एलसीबीचे पथक कर्जत परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, परमेश्वर बन्सी घनवट (रा. चापडगाव ता. कर्जत) याने त्याच्या शेतामध्ये शासनाने लागवडीस व उत्पादन घेण्यास प्रतिबंधित असलेले अफू झाडांची लागवड करुन संवर्धन केले आहे. त्यानुसार पथकाने कर्जत पोलिसांच्या सहकार्याने छापा टाकला असता चापडगाव शिवारातील शेती गट नं.१३ मध्ये परमेश्वर बन्सी घनवट याने दोन ते तीन महिन्यांपूर्वी लावून जोपासलेली अफूची झाडे आढळून आली.या ठिकाणाहून २३८.२३९ किलोग्रॅम वजनाची ४७ लाख ६४ हजार १८० रुपये किमतीची अफूची झाडे जप्त करण्यात आली. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**पथकात यांचा सहभाग**

**सदर कारवाईत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच उपनिरीक्षक अनंत सालगुडे, समीर अभंग, दीपक घाटकर, विजय पवार, अतुल लोटके, संतोष खैरे, अमृत आढाव, चालक उत्तरेश्वर मोराळे, अर्जुन बडे यांच्यासह कर्जत पोलीस ठाण्याचे सपोनि विजय झंजाड, पोलीस अंमलदार संजय सानप, किरण जाधव, सचिन थोरात यांनी सहभाग घेतला.**

## पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिला शिक्षिकेची सोनसाखळी लंपास

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पाचोड येथून मुरमा येथील जिल्हा परिषद शाळेत ड्युटीसाठी स्कुटीवरून जात असलेल्या एका महिला शिक्षिकेला पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवून अज्ञात चोरट्यांनी गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून नेल्याची घटना आज सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावर, पाचोड पोलीस ठाणे हद्दीत घडली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित महिला शिक्षिका पाचोड येथून मुरमा येथील जिल्हा परिषद शाळेत शाळेच्या कामासाठी स्कुटीवरून जात असताना महामार्गावर दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांना पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवले. शिक्षिका थांबताच त्यापैकी एकाने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने झडप घालून हिसकावले व साथीदारासह दुचाकीवरून वेगाने पसार झाले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पाचोड पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. या प्रकरणी पुढील तपास पाचोड पोलीस करत आहेत. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शहर विकासाच्या निर्णयांसाठी सुसज्ज सभागृहाची गरज - उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

### । राजमाता जिजाऊ सभागृहाची महापौर ज्योतीताई गाडे यांची पाहणी
### । सभागृहाचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण करा । प्रशासनाला सूचना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीतील राजमाता जिजाऊ सभागृहाची महापौर ज्योतीताई गाडे यांनी पाहणी करून सभागृहाचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश प्रशासनाला दिले.

महासभेदरम्यान शहराच्या विकासासंदर्भातील विविध प्रश्नांवर चर्चा होऊन अनेक महत्त्वाचे निर्णय या सभागृहात घेतले जातात. मात्र सभागृहाचे काम दीर्घकाळापासून प्रलंबित असल्यामुळे पदाधिकारी व अधिकाऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे राजमाता जिजाऊ यांच्या नावाला साजेसे आणि सुसज्ज असे सभागृह उभारण्यासाठी प्रशासनाने तातडीने काम सुरू करावे, अशा सूचना महापौर ज्योतीताई गाडे यांनी दिल्या.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी उपमहापौर गणेश भोसले, गटनेते प्रकाश भागानगरे, नगरसेवक सुरेश बनसोडे, ■ पान ४ वर



## महामंडळ म्हणजे पत्रकारांसाठी चॉकलेट

### प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाच्या धर्तीवर व्यवस्था निर्माण करा एस.एम.देशमुख यांची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करून पत्रकारांचे कोणतेही प्रश्न सुटणार नाहीत, त्यापेक्षा ''प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया'' च्या धर्तीवर महाराष्ट्रात एक सक्षम वैधानिक व्यवस्था निर्माण करण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे..



मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, एकनाथराव शिंदे मुख्यमंत्री असताना पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. तेव्हाच अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेसारखया काही संघटना आणि मान्यवर ज्येष्ठ पत्रकारांनी त्यास विरोध केला होता. त्यामुळे तो विषय तेथेच थांबला. मात्र काल पुन्हा विधिमंडळात हा विषय उपस्थित झाला. त्यात पत्रकारांसाठी महामंडळ लवकरच स्थापन करण्यात येईल अशी घोषणा आशिष शेलार यांनी केली आहे..

महाराष्ट्रात अगोदरच ■ पान ४ वर

## शिर्डीतील साईंच्या सेवेत रुजू असणाऱ्या दानशूर कर्मचारी विलास मामा कोते यांनी साई चरणी अर्पण केल अनोख दान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** देश-विदेशातील लाखो भाविकांची श्री साईबाबांवर अढळ श्रद्धा असून भाविक भक्तिभावाने श्रींच्या चरणी विविध स्वरूपात उदंड दान अर्पण करीत असतात. याच श्रद्धेपोटी शिर्डी व परिसरातील साईभक्तांनी श्री साईबाबांच्या चरणी देणगी अर्पण केली आहे.

श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे सेवानिवृत्त कर्मचारी श्री. विलास सोपान कोते, शिर्डी यांनी श्री साईबाबांच्या चरणी सुमारे ३ लाख ३५ हजार रुपये किंमतीचे देशी जातीचे ७० पोते हरभरे अर्पण केले. या हरभऱ्यांचा उपयोग संस्थानच्या श्री साईप्रसादालयात भाविकांना प्रसादरूपाने देण्यात येणाऱ्या भोजनातील भाजीसाठी करण्यात येणार आहे.





तसेच पुणतांबा येथील साईभक्त श्री. विलासराव दुरगुडे यांनी २ लाख ९९ हजार ९९९ रुपये किंमतीचे अपोलो एंड्युरंस कंपनीचे १६ नग टायर संस्थानकडे देणगी स्वरूपात सुपुर्द केले आहे. या टायरचा उपयोग श्री साईबाबा संस्थान ट्रस्टकडे उपलब्ध असलेल्या वाहनांसाठी करण्यात येणार आहे. या देणगीनंतर संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दोन्ही देणगीदार साईभक्तांचा सत्कार करून त्यांचे आभार व्यक्त केले.

## दै. आकर्षण निवडक

### मनपा गेटवर महापौर ज्योतीताई गाडे यांची अचानक तपासणी



**अहिल्यानगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर ज्योतीताई गाडे यांनी सोमवारी सकाळी महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारावर उभे राहून कर्मचाऱ्यांची उपस्थिती तपासली. या तपासणीदरम्यान सुमारे १५० कर्मचाऱ्यांपैकी ४१ कर्मचारी नियोजित वेळेनंतर कामावर येताना आढळून आले. यावेळी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना महापौरांनी चांगलेच सुनावले आणि पुढील काळात उशिरा येणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला.महापौर पदाची सूत्रे ६ फेब्रुवारी रोजी स्वीकारल्यानंतर तातडीने प्रशासनाची बैठक घेऊन सर्व कर्मचाऱ्यांनी वेळेवर कामावर हजर राहावे, गळ्यात ओळखपत्र असावे तसेच नागरिकांची कामे प्रामाणिकपणे पार पाडावीत, अशा सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र अनेक कर्मचारी या सूचनांचे पालन करत नसल्याचे दिसून येत असल्याने महापौरांनी स्वतःच तपासणी मोहीम हाती घेतली. सकाळी साडेनऊ वाजता महापालिकेच्या गेटवर उभे राहून त्यांनी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची नोंद घेतली. यावेळी सुमारे ४१ कर्मचारी उशिरा येताना आढळले. नागरिकांची कामे वेळेवर होत नसल्यामुळे त्यांना वारंवार महापालिकेत हेलपाटे मारावे लागतात. त्यामुळे नागरिकांचा रोष पदाधिकाऱ्यांवर व्यक्त होतो. त्यामुळे यापुढे कामचुकारपणा खपवून घेतला जाणार नाही, असे महापौरांनी स्पष्ट केले.''जे कर्मचारी प्रामाणिकपणे काम करतील त्यांच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे राहू; मात्र कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांना सोडले जाणार नाही. उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल आणि कोणाचीही गई केली जाणार नाही,'' असा इशाराही महापौर ज्योतीताई गाडे यांनी दिला.**

### खाकीतील कर्तृत्वान महिलांचा गौरव

**अहिल्यानगर - जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शहरातील कोतवाली पोलीस स्टेशन येथे महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. समाजातील नागरिकांच्या विशेषतः महिलांच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या महिला पोलीसांच्या योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग आणि ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना फेटे बांधून व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी कोतवाली पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे, पीएसआय आमीन शेख यांच्यासह कार्यरत सर्व महिला पोलीसांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक क्षेत्रातील रजनी ताठे, नलिनी गायकवाड, शारदा होशिंग, गौतमी भिंगारदिवे, निता कटारिया, सौ. बर्वे आदी महिला उपस्थित होत्या.यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिला पोलीसांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांच्या धैर्य, कर्तव्यदक्षता आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा गौरव केला. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी दिवस-रात्र काम करताना महिला पोलीस अनेक आव्हानांना सामोरे जात असतात, मात्र कर्तव्यनिष्ठेने त्या आपल्या जबाबदाऱ्या पार पाडतात,**

# संत आसारामजी बापू यांची निर्दोष मुक्ततेची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संत श्री आसारामजी बापू यांना तात्काळ सन्मानाने स्थायी मुक्तता देण्यात यावी, अशी मागणी महिला उत्थान मंडळाच्या वतीने व संत आसारामजी सेवा समिती, अखिल भारतीय छावा संघटना, अखिल विश्व वारकरी परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. समाजहितासाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या ८७ वर्षीय संतावर अन्याय झाल्याचा आरोप करत त्यांच्या सेवाकार्यांचा विचार करून न्याय मिळावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, देश आणि जगाच्या उन्नतीमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांना त्यांच्या वास्तविक सामर्थ्याची जाणीव करून देत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संत श्री आसारामजी बापू यांच्या प्रेरणेने महिला उत्थान मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. देशभरात या संस्थेच्या विविध शाखांद्वारे सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्य सातत्याने सुरू आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून बापूजींच्या मार्गदर्शनाखाली संस्कृती संरक्षण, व्यसनमुक्ती, युवक-युवतींना योग्य दिशा देणे, बालसंस्कार, विद्यार्थी शिबिरे, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण, व्यसनमुक्ती अभियान, युवक धन सुरक्षा अभियान, माता-पिता पूजन दिवस, तुलसी पूजन दिवस, गुरुकुलांचे संचालन, कैदी उत्थान कार्यक्रम, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदतकार्य आदी अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या सेवा उपक्रमांमुळे लाखो युवक-युवतींना योग्य संस्कार मिळाले असून अनेकांचे जीवन सकारात्मक दिशेने बदलले आहे, असे मंडळाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, काही कायदेशीर प्रक्रियांतील त्रुटी व पुराव्यांचा योग्य विचार न झाल्यामुळे संत आसारामजी बापू यांना अजीवन कारावासाची शिक्षा झाली. सध्या त्यांचे वय ८७ वर्षे असून आरोग्याची स्थिती लक्षात घेऊन त्यांना वैद्यकीय उपचारांसाठी संधी देण्यात आल्याबद्दल न्यायपालिकेचे आभार मानण्यात आले आहेत.

गेल्या ११ वर्षांनंतर त्यांना अंतरिम जामीन मिळाल्याचे सांगून, समाजहितासाठी कार्य करणाऱ्या या संताला आता कायमस्वरूपी सन्मानाने मुक्तता देण्यात यावी, अशी मागणी महिला उत्थान मंडळ व संत आसारामजी सेवा समिती, अखिल भारतीय छावा संघटना, अखिल विश्व वारकरी परिषदेच्या वतीने वतीने करण्यात आली आहे. तसेच महिलांच्या संरक्षणासाठी बनवलेल्या कायद्यांचा गैरवापर होऊ नये यासाठी प्रभावी धोरण आखण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

समाजाच्या व राष्ट्राच्या हितासाठी संतांना पुन्हा समाजात कार्य करण्याची संधी मिळणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी पतसंस्थेत सत्तांतर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदासाठी नुकतीच निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील किरण आव्हाड यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

संस्थेच्या चेअरमन पदासाठी झालेल्या मतदानात जगदीश भगवान वाघ यांना बहुमत मिळाले. एकूण झालेल्या मतदानात १६ विरुद्ध ५ मतांनी जगदीश वाघ यांची चेअरमनपदी निवड झाली. संचालक मंडळातील बहुसंख्य सदस्यांनी त्यांना पाठिंबा दिल्याने त्यांची निवड स्पष्ट बहुमताने झाली. तर व्हाईस चेअरमन पदासाठी किशोर धोंडीराम सांगळे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवड प्रक्रियेनंतर संस्थेच्या कामकाजाबाबत काही संचालकांनी मत व्यक्त केले. यावेळी विकास पॅनलचे अध्यक्ष किशोर गांगर्डे यांनी मावळत्या चेअरमनवर टीका करताना सांगितले की, एकाधिकारशाही पद्धतीने मनमानी कारभार केला जात होता. त्यांच्या विरोधात अविश्वास ठराव मंजूर झाल्यानंतरही पदाचा मोह सुटत नव्हता. संस्थेतील काही कामकाजात भ्रष्टाचार उघड झाल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

# संस्थेतील कमर्चारीच खरी ताकद – जी डी खानदेशे

## मुख्याध्यापक शिवाजी धामणे यांचा निरोप समारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा मराठा समाज संस्थेतील सर्व कर्मचारीच खरी ताकद असून त्यामुळेच संस्था जिल्हातील प्रमुख शैक्षणिक संस्था आहे. असे प्रतिपादन संस्थेचे मा.सचिव जी डी खानदेशे यांनी व्यक्त केले. यशवंत माध्यमिक विद्यालय शिराळ येथील मुख्याध्यापक शिवाजी धामणे हे नुकतेच सेवा निवृत्त झाले त्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव अड. विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, प्राचार्य दत्ता पा. नारळे , मा.जिल्हा परिषद बाळासाहेब हराळ, मा.प्राचार्य मनोहर कारंडे, प्रा.सुनील जाधव, मा.उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाशजी भागानगरे, केंद्रप्रमुख संजय धामणे, शिक्षणाधिकारी अशोक कडूस, श्री अशोक म्हस्के, टांगळ सर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा संचालक नंदकुमार शिर्के, यशवंत विद्यालयाचे सर्व सहकारी, नातेवाईक मित्र परिवार असे सर्व उपस्थित होते.

खानदेशे यांच्या हस्ते धामणे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आठरे यांनी देखील धामणे यांच्या एकूण सेवेचा गौरव केला. यावेळी आठरे यांनी धामणे यांच्या पत्नी सौं शितल धामणे यांचे देखील कौतुक केले. धामणे यांनी एकूण ३४ वर्ष सेवा केली. संस्थेच्या विविध शाखेत सेवा केली त्या प्रत्येक संस्थेतील अनेक विद्यार्थी आज उच्च पदावर काम करत, काही व्यवसाय करतात. हेच प्रत्येक कर्मचाऱ्याचे काम आहे. त्यामुळेच संस्था नावारूपाला येत असते.

धामणे यांनी देखील सत्काराला उत्तर देताना सर्वांचे आभार व्यक्त करून संस्थेला आर्थिक मदत केली. त्याच बरोबर स्वर्गीय माधवराव मुळे सामाजिक प्रतिष्ठाणला देखील सहकार्य केले. धामणे यांच्या सुनबाई स्नेहल तुषार धामणे यांनी मनोगत व्यक्त करून धामणे यांच्यातील व्यक्ती म्हणून असलेल्या गुणांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन दिनकर मुळे,स्मिता ठाकर, सविता घुने यांनी केले.

# श्रीमंत बालाजी गणेश मंदिराचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पंचरंग गल्ली, जुने विठ्ठल मंदिरासमोर, तोफखाना परिसरातील श्रीमंत बालाजी गणेश मंदिराचा १४ वा वर्धापनदिन उत्सव पंचरंग युवक मंडळ ट्रस्टच्या वतीने नुकतीच अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दोन दिवस चाललेल्या या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मंदिर परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला.

उत्सवाच्या पहिल्या दिवशी सायंकाळी श्री हनुमान चालीसा पठन व भजनसंध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीरामभक्त हनुमान सत्संग मंडळ, श्रीराम मंदिर, नवीपेठ यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित भाविकांना भक्तिरसात रंगवून टाकले. हनुमान चालीसाचे सामूहिक पठण, विविध भक्तिगीते व भजनांच्या सादरीकरणामुळे मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

वर्धापनदिनानिमित्त सकाळी गणेश पूजनाने कार्यक्रमांची सुरुवात झाली. त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात कलश मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत महिला-पुरुष व युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पुढे अभिषेक पूजा व विधिवत होम-हवन संपन्न झाले. वेदघोष आणि मंत्रोच्चारांच्या निनादात पार पडलेल्या या धार्मिक विधींमुळे वातावरण पवित्र आणि आध्यात्मिक झाले.

या वर्धापन उत्सवानिमित्त पंचरंग युवक मंडळ ट्रस्टच्या वतीने भव्य महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला होता. या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी परिसरासह शहरातील असंख्य भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिभावाच्या वातावरणात महाप्रसादाचे वितरण करण्यात आले असून अनेक भाविकांनी प्रसादाचा लाभ घेत समाधान व्यक्त केले.

या प्रसंगी नवनिर्वाचित महापौर सौ. ज्योतीताई गाडे व उपमहापौर अँड. धनंजय भैय्या जाधव यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तसेच सौ. शीतलताई अजय ढोणे (नगरसेविका), सागरभाऊ मुर्तडकर (नगरसेवक), मयुरीताई सुशांत जाधव (नगरसेविका), श्रीनिवासजी बोज्जा (अध्यक्ष पद्मशाली पंचकमिटी), श्री गणेश (बंडूशेठ) विद्ये (अध्यक्ष श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट), संतोषभाऊ बिज्जा व महेंद्रभाऊ बिज्जा (समाजसेवक), सुरजभाऊ जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. मान्यवरांनी मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजकांचे कौतुक करत धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांमुळे समाजात ऐक्य आणि अध्यात्मिक वातावरण वृद्धिंगत होत असल्याचे मत व्यक्त केले.

# रात्रशाळेतील महिलांच्या संघर्षमय शिक्षण प्रवासाला सलाम- अनुराधा देशमुख

**महिला दिनानिमित्त विद्यार्थिनी व शिक्षिकांचा गौरव । हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये सन्मान सोहळा उत्साहात । मासूम संस्थेकडून रात्रशाळेतील महिला व युवतींसाठी तब्बल ८ लाखांची शिष्यवृत्ती**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रात्रशाळेत प्रवेश घेऊन जीवनातील अनेक अडचणींवर मात करत शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या महिला व युवतींसह त्यांना शिक्षण देणाऱ्या महिला शिक्षिकांचा आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त गौरव करण्यात आला. शहरातील हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मासूम संस्थेच्या वतीने रात्रशाळेतील महिला व युवतींना शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणासाठी तब्बल ८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. ही शिष्यवृत्ती मिळवणाऱ्या महिला व युवतींचा देखील यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

पेमराज सारडा ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला हिंदुस्तान पेट्रोलियम गॅस वितरक अनुराधा देशमुख, आडसुळ इंजिनिअरींग कॉलेज डेप्युटी ऑफिस सुप्रिटेंडंट सौ. शकुंतला पाटील, अॅड. शुभांगी रोहोकले, नाईट हायस्कूल चेअरमन प्रा. ज्योतीताई कुलकर्णी, प्राचार्य सुनिल सुसरे, शालेय समिती सदस्य विलास बडवे, शिक्षक प्रतिनिधी मंगेश भुते, शिक्षकेतर प्रतिनिधी कैलास बालटे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, रात्रशाळेत महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून महिला व युवती कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत शिक्षण घेत आहेत. या रात्रशाळेतील विद्यार्थिनींनी राज्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून अभिमानास्पद कामगिरी केली आहे. मुलगी लग्नापूर्वी आणि लग्नानंतर दोन्ही कुटुंब उजळून टाकते. जीवनात आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी नियमित व्यायाम व चांगला आहार महत्त्वाचा आहे. महिलांचे आरोग्य चांगले असल्यास त्या संपूर्ण कुटुंबाची काळजी घेऊ शकतात. ज्या घरात महिलांचा मान-सन्मान राखला जातो, तेथे लक्ष्मी प्रसन्न राहते, असे त्या म्हणाल्या. पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य सुनील सुसरे यांनी केले.

अनुराधा देशमुख म्हणाल्या की, महिलांनी त्यागाची भूमिका सोडून प्रगती साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतः वर प्रेम करावे आणि शिक्षण, आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिल्यास यश मिळते. शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थिनींनी या संधीचे सोने करून स्वतःमधील क्षमता ओळखावी, असे त्यांनी आवाहन केले.

शकुंतला पाटील म्हणाल्या की, प्रत्येक दिवशी महिलांचा सन्मान झाला पाहिजे. संसाराची जबाबदारी सांभाळून रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या महिलांचे कार्य कौतुकास्पद आहे. जीवनात विपरीत परिस्थिती आल्यास न डगमगता परिस्थितीचा धैर्याने सामना करा आणि गुरुजनांचा आदर राखा. आयुष्यात अनेक परीक्षा येतात, त्यांना आत्मविश्वासाने सामोरे जाणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

अॅड. शुभांगी रोहोकले म्हणाल्या की, लग्नानंतर महिलांनी आपले करिअर थांबवू नये. शिक्षणामुळे आत्मनिर्भरता मिळते. सासर कसे असेल याची शाश्वती नसल्याने शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे आवश्यक आहे. शेवटपर्यंत शिक्षणच आपल्याला तारणार आहे.

# कृषिक्षेत्रात एआयचा वापर करून नवनवीन प्रयोग करा - पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

**डॉ.विखे पाटील महाविद्यालयात 'कृषि बहार२०२६' स्नेहसंमेलन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्या नगर येथील विळद घाट मधील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालयात'कृषि बहार२०२६' वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण रंगतदार केले. तसेच महाविद्यालयांतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये क्रिकेट, हॉलीबॉल, खो-खो, बॅडमिंटन, गोळाफेक, कबड्डी व रस्सीखेच अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या संघांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त अॅड. वसंतराव कापरे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना घार्गे म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल होत असून कृषि पदवी घेणारे बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम करणे आवश्यक आहे. एखाद्या क्षेत्रात अपेक्षित यश मिळत नसेल तर परिस्थितीनुसार मार्ग बदलून पुढे जावे. सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा वापर विविध क्षेत्रांत वाढत असून शेतीशास्त्रामध्येही त्याचा उपयोग होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एआयचा वापर करून कृषिक्षेत्रात नवनवीन प्रयोग करावेत. शिक्षणाबरोबर खेळाकडेही लक्ष दिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात अॅड. वसंतराव कापरे म्हणाले की, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांमुळे ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे आज संस्थेच्या विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी अनेक क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांनी कृषिक्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये नवे प्रयोग करावेत आणि कृषिक्षेत्राच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे. देशाच्या जडणघडणीत कृषिक्षेत्राचा मोठा वाटा असून भविष्यात या क्षेत्रात युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत, असेही त्यांनी सांगितले.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ※संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### जय आनंद महावीर युवक मंडळाचा अनामप्रेम येथील मुलांसमवेत आनंदोत्सव



अहिल्यानगर- भारतीय क्रिकेट संघाने टि ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा मोठा पराभव करून विश्वचषकाला गवसणी घातली. रविवारी रात्री देशभरात एकच जल्लोष करण्यात आला. नगरमधील जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने भारताच्या विजयाचा आनंदोत्सव गांधी मैदान येथील अनामप्रेम संस्थेतील अंध मुलांसमवेत साजरा केला.यावेळी मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, कुंतीलाल राका, अमित गांधी, अजय गांधी, अनामप्रेम संस्थेचे सचिन गारदे, अमृत भुसारी आदी उपस्थित होते. मंडळाच्या वतीने अनामप्रेम येथील मुलांना थंडगार ॲपल ज्युस तसेच क्रिकेट खेळण्यासाठी किट देण्यात आली. आनंद मुथा म्हणाले की, सूर्याकुमार यादव याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. अहमदाबाद येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडला पराभूत करून विश्वचषक जिंकला. हा भारतासाठी आणि क्रिकेट चाहत्यांसाठी सर्वोच्च आनंदाचा क्षण ठरला. हा आनंद साजरा करण्यासाठी आम्ही अनामप्रेम संस्थेतील अंध मुलांना क्रिकेट साहित्याची भेट दिली. या मुलांमध्येही क्रीडा गुण असतात. त्यांना योग्य प्रोत्साहन आणि पाठबळ मिळणे आवश्यक असते. मुलांना दिसत नसले तरी त्यांनीही भारतीय संघाच्या विजयाचा आनंद उत्साही वातावरणात साजरा केला. भविष्यातही अध्यक्ष शैलेश मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ या मुलांसाठी विविध उपक्रम राबवले अशी ग्वाही मुथा यांनी दिली.

### अहमदनगर कॉलेजमध्ये महिला दिनानिमित्त वूमन सेल आयोजित विविध कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद



अहिल्यानगर - आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अहमदनगर कॉलेजमध्ये वूमन सेल तर्फे दोन दिवसीय विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना विद्यार्थीनी व सर्व महिला कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.६ मार्च रोजी या विषयावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रियंका पाटील यांना आमंत्रित करण्यात आले त्यांचा सत्कार रजिस्ट्रार कल्पलता भिंगारदिवे यांनी केला ,डॉ प्रियंका पाटील यांनी महिला कर्मचारी व विद्यार्थीनींना दैनंदिन जीवनातील त्वचा संरक्षणाच्या सवयी तसेच निरोगी आणि आरोग्यदायी त्वचेसाठी आवश्यक उपाययोजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.७ मार्च रोजी स्पर्धा तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रिबन कापून करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी विविध संस्कृतींतील पोशाख परिधान करून गाण्याच्या तालावर रॅम्प वॉक सादर केला. विविध पारंपरिक वेशभूषा आणि दागिने परिधान करून विद्यार्थिनींनी प्रभावी सादरीकरण केले. या स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी श्रुती मानवेलीकर (सुरभी ब्युटी अकॅडमी ओनर), ॲड. रचना काकडे (फॅशन डिझायनर) आणि करिष्मा कोठारी (भरतनाट्यम नृत्य प्रशिक्षक) यांना परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांचा सत्कार वूमन सेल कॉर्डिनेटर प्रा.रुपाली कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. त्याच वेळी उपस्थित आदरणीय प्राचार्य डॉ अभिजीत कुलकर्णी सर यांचादेखील सत्कार रजिस्टर कल्पलता भिंगारदिवे यांच्या हस्ते करण्यात आला. परीक्षकांच्या निर्णयानुसार होण्याचा मान भूमिका बरुआ हिने पटकावला. (द्वितीय क्रमांक) अंशु उपाध्याय हिने, तर (तृतीय क्रमांक) साक्षी झवरे हिने मिळवला.

# ९१११ डोंबिवलीकरांनी रचला इतिहास, मोडला सांगलीकरांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डोंबिवलीसह कल्याण तालुक्यातील ९ हजार १११ महिला आणि विद्यार्थीनींनी एकत्र येत सामूहिक लेझीम वादनात एक जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड करून डोंबिवलीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक लेझीम वादन स्पर्धेत रविवारी येथील श्री संत सावळाराम क्रीडा संकुल या क्रीडांगणामध्ये ठाणे जिल्ह्यातील शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी आणि महिला भगिनी आदींनी एकत्र येत ९,१११ एवढ्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा वर्ल्ड रेकॉर्ड केला. या आधी सांगलीकरांच्या नावाने हा रेकॉर्ड होता, अशी माहिती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे लंडनहून आलेले अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी सांगितले. त्या ठिकाणी या आधी ७ हजार ३३८ महिलांनी एकत्र येऊन तो रेकॉर्ड रचला होता, मात्र तो रविवारी डोंबिवलीत मोडण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले.

साडेपाच मिनिटांची विविध प्रात्यक्षिक सादर करून महिलांनी हा रेकॉर्ड केला. त्यावेळी स्वप्नील डांगरेकर यांनी आमदार रविंद्र चव्हाण यांच्या पत्नी सुहासिनी रविंद्र चव्हाण यांच्याकडे वर्ल्ड रेकॉर्ड झाल्याचे सर्टिफिकेट व मेडल हस्तांतरीत केले.

त्यावेळी रविंद्र चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानत लेझीम ही आपली संस्कृती असून ती टिकवणे हे आपले काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या वर्षी शारीरिक व्यायामावर भर देऊन जगासमोर सशक्त भारत कसा असू शकतो हे दाखवून देण्याचा संकल्प सोडला होता, त्या निमित्ताने महिला आणि विद्यार्थीनी आदींनी एकत्र येऊन हा अनोखा रेकॉर्ड केला याचा मला डोंबिवलीकर म्हणून प्रचंड आनंद आहे, हा रेकॉर्ड मी भारत मातेच्या चरणी समर्पित करतो असेही उद्गार त्यांनी यावेळी काढले. कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीचे त्यांनी आभार मानले. शिक्षक, विद्यार्थी आदींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सारा आसमंत भारत माता की जय, जय श्रीराम, वंदे मातरमने दणाणून सोडला होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वर्ल्ड रेकॉर्ड केल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. लेझीमचा झुंकार सर्वत्र निनादत होता, ढोल ताशांच्या गजरात त्या रेकॉर्डचे हजारो डोंबिवलीकरांनी स्वागत केले, आणि प्रत्येकाच्या सहभागाबद्दल कौतुक करण्यात आले. अशा दैदिप्यमान सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी पहाटेपासून डोंबिवलीकर प्रतीक्षेत होता, अखेर वर्ल्ड रेकॉर्डची घोषणा होताच प्रचंड जल्लोषात त्याचा आनंद व्यक्त करण्यात आला.

# आरोग्य संदर्भात सरकारी दरबारी लक्ष वेधणार – डॉ.ज्ञानेश्वर दराडे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**खरवंडी कासार –** ऊस तोडणी मजुर व वाहतुक कामगार यांच्या आरोग्य संबधीत सुव्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी माजी ग्रामविकास मंत्री पंकजा मुंढे अँड.प्रताप ढाकणे यांच्या माध्यमातुन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे लक्षा वेधणार असुन देवनाथ फाऊंडेशन वतीने भगवानगड परिसरात ठोस कृती उपाय योजना निर्माण करण्यासाठी सदैव प्रयत्नशिल आहे असे मत देवनाथ फाऊंडेशन प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर दराडे चांनी व्यक्त केले ते दि. ८मार्च रोजी महीलांसाठी मोफत आरोग्य शिबीर प्रसंगी बोलत होते आरोग्य तपासणी शिबीर संत जनार्धनस्वामी मंदीर समोर डॉ. देशमुख हॉस्पिटल येथे संपन्न झाले स्व. लोकनेते गोपिनाथ मुंढे स्व. माजी मंत्री बबनराव ढाकणे यांनी आपले आयुष्य ऊसतोड मजुरासाठी अर्पित केले आपण सुद्धा समाजाच काही देण लागतो ऊस तोड मजुरा संदर्भात ढोस उपाय योजना केल्याशिवाय शांत बसणार नाही असे डॉ. ज्ञानेश्वर दराडे म्हणाले ते मोफत आयोजित आरोग्य शिबीर प्रसंगी बोलत होते कार्यक्रमाची सुरुवात श्रीसंत जनार्धंन स्वामी समाधीस्थळाचे पुजन करून झाली कार्यक्रमाचे अध्यक्ष निंबादैत्य संस्थान अध्यक्षस्थानी डॉ.सुभाष देशमुख विश्वस्थ दहिफळे होते प्रतीमा पुजन डॉ.वर्षा गिते डॉ. संतोष गिते डॉ.श्रीधर देशमुख डॉ.ज्योती देशमुख डॉ. विद्या दराडे शिक्षक नेते जालींदरनाथ संस्था अध्यक्ष मिथुन डोंगरे डॉ.रावसाहेब आव्हाड चंद्रकांत कटारिया प्रकाश कटारिया यांच्या हस्ते प्रतिमा पुजन दिप प्रज्वलन करण्यात आले प्रास्ताविक कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर दौंड अध्यक्षिय अनुमोदन योगेश सुनिल अंदुरे आभार प्रकाश कटारिया यांनी मानले यावेळी महीला दिना निमित्त महिलांना गुलाब पुष्प देऊन सन्मानीत करण्यात आले आरोग्य शिबीरात ११२ महीलांची तपासनी करण्यात आली यावेळी डॉ.संतोष गिते म्हणाले की बदलत्या जिवन शैलिमुळे आरोग्याची कशी काळजी घ्यायची यावर मार्गदर्शन केले तर आरोग्य सेवेचे पंन्नास वर्षे पुर्ण झाल्या बद्दल निंबादैत्य संस्थाण अध्यक्ष डॉ.सुभाष देशमुख यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत विषेश सन्मान करण्यात आला यावेळी मेडीकल असोशियशनचे अमोल देशमुख पत्रकार सतिष जगताप जयभगवान युवा प्रतिष्ठाण अध्यक्ष अनिल जवरे अंकुश जवरे पत्रकार विजय शिवगजे महादेव जगताप रमेश अंदुरे पांडुरंग जगताप आदी उपस्थित होते .

# कुटुंबाचे आरोग्य सांभाळणाऱ्या महिलांनी स्वत:चे आरोग्य जपावे – महापौर ज्योतीताई गाडे

## महिला दिनानिमित्त भिंगारमध्ये महिला भाविकांची मोफत दंतरोग तपासणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील तपेश्वर महादेव मंदिर परिसरात महिला भाविकांसाठी मोफत दंतरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. मोठ्या संख्येने महिला भाविकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अतुल मडावी, इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉ. ओंकार भालसिंग, ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, रमेश वराडे, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, सीए रवींद्र कटारिया, सचिन चोपडा, सुंदरराव पाटील, दिलीपराव ठोकळ, रतन मेहेत्रे, ह.भ.प. गोकुळ धाडगे, अशोक पराते, अतुल मडावी, दीपक धाडगे, ईवान सपकाळ, मनोहर दरवडे, संजय भिंगारदिवे, राजू चंगेडिया, प्रांजली सपकाळ, सुनिता वराडे, संगीता सपकाळ, उषाताई ठोकळ, मीना ससाणे, सुषमा पाटील, ज्योती भिंगारदिवे, कुसुमबाई धाडगे, लता वाघस्कर, ह.भ.प. मायाताई गोरखा, सरिता शिंदे, भारती कटारिया, सुरेखा आमले, ह.भ.प. रेखाताई मडावी, माधवी माळगे, सुप्रिया रासकर, पूजाताई मडावी, पठाण मॅडम, श्रद्धा मडावी, सुरेखा बागल, शीतलताई मडावी, कुलदीप भगवाने, मायरा दरवडे, अनिता शेलार, महिमा माळगे आदी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या आरोग्याची काळजी घेणारे असे उपक्रम अत्यंत आवश्यक आहेत. महिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना स्वतः च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. दातांचे आरोग्य हे एकूण आरोग्यासाठी महत्त्वाचे असते. हरदिन मॉर्निंग ग्रुपने घेतलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असून अशा सामाजिक उपक्रमांमुळे आरोग्यविषयक जागरूकता वाढण्यास मदत होते.

# जागतिक महिला दिनानिमित्त वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भगवानगड परिसर हा ऊसतोडणी मजूर कामगारांचं आगार म्हणून ओळखला जातो.स्त्री-पुरुष समानता या कष्टकरी वर्गात प्रभावाने आढळते.स्त्रियांशी निगडित अनेक आरोग्याच्या समस्या आढळून येतात.ऊसतोडणी मजूर कामगारांच्या आरोग्य संवर्धन,संरक्षण आणि प्रबोधनासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या डॉ.ज्ञानेश्वर दराडे आणि डॉ.सौ.विद्या दराडे यांनी या महिला दिनानिमित्त ऊसतोडणी कामगारांचे चिरंजीव असलेले आणि अहिल्यानगर येथील साई माऊली हॉस्पिटल चे संचालक डॉ.संतोष गिते आणि डॉ.सौ.वर्षा गिते-कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन केले. आयुर्वेदतज्ञ,निरूपणकार डॉ.श्रीधर देशमुख आणि प्रसिध्द वंध्यत्व तज्ञ डॉ.सौ.ज्योती देशमुख यांच्या उपस्थितीने एकप्रकारे तीन पॅथीज् चा अनोखा संगम या सेवाकार्यात जुळून आला.

याप्रसंगी खरवंडी कासार येथील जेष्ठ धन्वंतरी तथा श्री.निंबादैत्य देवस्थान सार्वजनिक ट्रस्ट, दैत्यनांदूर चे अध्यक्ष डॉ. एस.एम.देशमुख यांचा त्यांनी केलेल्या प्रदीर्घ पन्नास वर्षांच्या रुग्णसेवेबद्दल विशेष सन्मान, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. शिबीरामध्ये ११२ रूग्णांची तपासणी करण्यात आली.ईसीजी,ब्लड शुगर,सीबीसी चाचण्या करण्यात येऊन,यथोजित समुपदेशन,उपचार करण्यात आले.

डॉ.संतोष गिते यांनी आपल्या मनोगतात बदलत्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या अनारोग्याची काळजी कशी घ्यावी यावर विस्तृत मार्गदर्शन करत ऊसतोडणी मजूर कामगारांना नेहमीच साई माऊली हॉस्पिटल विशेष सवलतीत उपचार करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# नाथषष्ठी महोत्सवानिमित्त विलास भुमरे प्रतिष्ठानकडून भाविकांना शरबत, टरबूज व काला प्रसाद वाटप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** पैठण येथे संत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी महोत्सवानिमित्त तीन दिवस चाललेल्या उत्सवादरम्यान विलास भुमरे प्रतिष्ठानच्या वतीने भाविकांसाठी शरबत, टरबूज तसेच काला प्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रेला मोठ्या संख्येने येणाऱ्या वारकरी भाविकांची तहान-भूक भागवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

या सेवाभावी उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नगरसेवक गणेश वरकड, सुनील हिंगे, शेखर शिंदे, संजय कस्तुरे तसेच नवगावचे माजी सरपंच किशोर चौधरी आदी उपस्थित होते.

नाथषष्ठी महोत्सवात दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक संस्था व प्रतिष्ठानांच्या माध्यमातून भाविकांची सेवा करण्यात येत असून अशा उपक्रमांमुळे यात्रेचे वातावरण अधिक भक्तिमय व सेवाभावी होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# अहिल्यानगरातील माणिकताई करंदीकर हायस्कूलमध्ये महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान सोहळा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर येथील जानकीबाई आपटे बालिकाश्रम संस्था संचलित माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथे विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न झाला. समाजाच्या विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या महिला तसेच विद्यालयाच्या आजी-माजी शिक्षिका व माजी विद्यार्थिनींचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी तसेच विद्यमान नगरसेविका मा. सौ. आशा डागवाले मॅडम व मा. सौ. सुनीता फुलसौंदर मॅडम प्रमुख उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र, बुरुडगाव (अहिल्यानगर) येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. जयश्री कुंटला मॅडम या देखील विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी असून त्या आवर्जून उपस्थित राहिल्या. तसेच संस्थेच्या बालिकाश्रम बालक मंदिर प्राथमिक शाळेतून सेवानिवृत्त झालेल्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती सोहनी मॅडम, श्रीमती देशमुख मॅडम, माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनियर कॉलेजच्या माजी प्राचार्या श्रीमती आरती थोरात मॅडम, श्रीमती बोराडे मॅडम तसेच सौ. कसोटे मॅडम, सौ. लांडे मॅडम, सौ. धावडे मॅडम, श्रीमती गायकवाड मॅडम, श्रीमती परदेशी मॅडम, सौ. कुलकर्णी मॅडम, सौ. अनु साळवे यांच्यासह सर्व शिक्षिका आणि विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा सन्मान संस्थेचे कार्याध्यक्ष मा. डॉ. नीरज करंदीकर साहेब व संस्थेच्या सचिव मा. सौ. दीप्ती करंदीकर मॅडम यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे माजी प्राचार्य मा. श्री रमेश जाधव सर, माजी शिक्षक मा. श्री रवींद्र सातपुते सर, मा. श्री रवींद्र बेलेकर सर, मा. संभाजी पवार सर, श्री किशोर अहिरे सर, श्री सुहेल शेख सर, श्री शरीफ बेग, श्री सुनिल मुळे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी महिला दिनानिमित्त महिलांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या सचिव मा. सौ. दीप्ती करंदीकर मॅडम यांनी प्रास्ताविक करत उपस्थित सर्व मान्यवर व महिलांचे स्वागत केले. त्यांनी सर्व महिलांच्या भावी आयुष्यासाठी आनंददायी, आरोग्यदायी व यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच येत्या २५ एप्रिल रोजी होणाऱ्या माजी विद्यार्थिनींच्या मेळाव्याच्या आयोजनासंदर्भात आपले विचार मांडले.

# अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत बाबाजी तरटे मैदानात

## पतसंस्था फेडरेशन गटातून संचालक पदासाठी तयारी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** पारनेर तालुक्यातील सहकार क्षेत्रात सक्रिय असलेले व पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बाबाजी तरटे हे आता (अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक) यांच्या आगामी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पतसंस्था फेडरेशन गटातून संचालक पदासाठी ते निवडणूक लढविण्याची तयारी करत असल्याची माहिती समोर आली आहे.

बाबाजी तरटे हे नगर दक्षिणचे खासदार डॉ निलेश लंके यांचे विश्वासू व खंदे समर्थक म्हणून ओळखले जातात. सध्या ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) या पक्षाचे पारनेर तालुका अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. सहकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांचे मजबूत जाळे असून विविध पक्षांतील नेत्यांशी त्यांचे चांगले संबंध असल्याचे मानले जाते. त्यामुळे त्यांच्या संभाव्य उमेदवारीमुळे पारनेर तालुक्यातील सहकार व राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती म्हणून काम करताना बाबाजी तरटे यांनी बाजार समितीच्या कामकाजात पारदर्शकता आणत अनेक विकासात्मक निर्णय घेतले होते. शेतकरी, व्यापारी आणि सहकारी संस्थांच्या हिताचे निर्णय घेतल्यामुळे त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक झाले आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी विविध उपक्रमही राबवले होते.

सध्या पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून पारनेर-भाळवणी येथे बाजार समितीचे कामकाज सुस्थितीत सुरू असून या कामकाजावर बाबाजी तरटे यांचे बारकाईने लक्ष असल्याचे सांगितले जाते. तसेच टाकळी ढोकेश्वर येथेही कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव पुढे सरकत असून लवकरच शेतकऱ्यांसाठी ही एक आनंदाची बातमी ठरणार असल्याची चर्चा आहे. तसेच नगर जिल्ह्यातील पतसंस्था चळवळीतही बाबाजी तरटे हे एक परिचित नाव मानले जाते. सहकार क्षेत्रातील विविध पदांवर काम करत त्यांनी संस्थात्मक विकासाला चालना दिली असून ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीबाबत बोलताना बाबाजी तरटे म्हणाले, ''बाजार समितीमध्ये केलेले काम आणि पतसंस्था चळवळीत मिळालेला अनुभव याचा निश्चितच या निवडणुकीत फायदा होईल. सहकार क्षेत्र अधिक मजबूत करण्यासाठी काम करण्याची संधी मिळावी, हीच अपेक्षा आहे.''

# नाथषष्ठी यात्रेदरम्यान गोदावरीत वारकरी बुडून मृत्यू

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** येथील नाथषष्ठी यात्रेदरम्यान गोदावरी नदीत पोहण्यासाठी गेलेल्या एका वारकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. सिल्लोड तालुक्यातील हाळदा येथील दिंडी पालखी नाथषष्ठी यात्रेसाठी पैठण येथे आली होती. यावेळी वारकरी बाबुराव रुद्राची बगळे (वय ६०, रा. हाळदा, ता. सिल्लोड, जि. संभाजीनगर) हे गोदावरी नदीत पोहण्यासाठी उतरले असता अचानक पाण्यात बुडाले.

घटनेची माहिती मिळताच पैठण बंदोबस्तासाठी तैनात असलेले अग्निशमन पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. सुमारे दोन तासांच्या अथक शोध मोहिमेनंतर अग्निशमन दलाने त्यांचा मृतदेह नदीतून बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात दिला. ही कारवाई मुख्य अग्निशमन अधिकारी अशोक खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यामध्ये उप अग्निशमन केंद्र अधिकारी विजय राठोड, ड्युटी अधिकारी छत्रपती केकान तसेच अग्निशामक जवान सचिन शिंदे, अक्षय नागरे, राजू ताटे, विशाल निंबाळकर आणि वाहन चालक चंद्रसिंग गीते यांनी सहभाग घेतला. या घटनेमुळे नाथषष्ठी यात्रेत काही काळ हळहळ व्यक्त करण्यात आली.

# एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाचे घवघवीत यश

## १८ विद्यार्थी एन.एम.एम.एस. परीक्षेत पात्र; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एन.एम.एम.एस.) मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षांसाठी दरवर्षी १२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.

या केंद्रशासित परीक्षेस विद्यालयातील एकूण २९ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १८ विद्यार्थ्यांनी यश मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामध्ये सत्यजीत संजय नाबगे याने विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला असून आयुष रवींद्र फाटक याने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. विशेष म्हणजे या दोन्ही विद्यार्थ्यांनी गणित विषयात २० पैकी २० गुण मिळवून आपली उत्कृष्ट गुणवत्ता सिद्ध केली. तसेच बुद्धिमत्ता विषयामध्ये सत्यजीत नाबगे याला ९० पैकी ८४, तर आयुष फाटक याला ९० पैकी ८३ गुण मिळाले आहेत.

या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या इतर विद्यार्थ्यांमध्ये ऋतुजा पोकळे, यशवर्धन पाटील, प्रिया दिघे, अभय वनवे, सार्थक भापकर, सोहम काळे, अथर्व चाकुरे, श्रेया लोखंडे, अनुष्का कर्डिले, समृद्धी मोढवे, रेवा आळंदी, श्रावणी कराड, ज्ञानेश्वरी खेडकर, मोहम्मद तांबोळी, अमृता प्रजापती आणि सोनाक्षी नवसुपे यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम आणि अभ्यासाच्या बळावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अर्जुनराव पोकळे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विक्रम वाडेकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, माजी सचिव प्राचार्य शिवाजीराव भोर, विष्णुपंत म्हस्के, अंबादास गारुडकर, शामराव व्यवहारे, विश्वासराव काळे, माजी सहसचिव के. एच. शिंदे, तसेच माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजिंक्य फिटनेस वर्ल्डच्या वतीने महिला दिन व शिवजयंती उत्सव साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिन व शिवजयंतीच औचित्य साधून नगरच्या 'अजिंक्य फिटनेस वर्ल्ड'च्या वतीने या दोन्ही उत्सवाचे मोठ्या आनंदाने आयोजन करण्यात आले होते श्री छत्रपती शिवरायांच्या पूर्णकृती अश्वारूढ पुतळ्यास या फिटनेस मधील मुली व महिलांनी छत्रपती शिवरायांच्या जयजयकार करून हारअर्पण करून तसेच आरती करून त्यांना अभिवादन केले. याचे सर्व संयोजन फिटनेस वर्ल्ड च्या संचालिका सौ गायत्री गायकवाड व अभिजीत गायकवाड यांनी केले होते. गायत्री गायकवाड यांनी उपस्थित सर्व महिलांना याप्रसंगी केशरी फेटे बांधून फेटे बांधून शाल,श्रीफळ देऊन सर्वांचे स्वागत केले व आज पुरुषांच्या बरोबरीनेच स्त्रिया या सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवीत असून असेच आपण आपल्या कर्तुत्वाने पुढे पुढे जात रहा अशा शुभेच्छा देऊन दरवर्षी आमच्या फिटनेस वर्ल्ड च्या वतीने महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी असे विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात याचाही फायदा या मुली व महिलांनी घ्यावा असे आवाहन केले. त्यापुढे म्हणाल्या की आजच्या गतिमान युगामध्ये आपले जीवन आरोग्यदायी कसे होईल यासाठी महिलांनी एक तास तरी रोज व्यायामासाठी किंवा योगासाठी द्यावा कारण ही जोपासलेली क्रीडा संस्कृती हीच आपल्याला आपले पुढील आयुष्य रोगमुक्त कशा पद्धतीने राहील यासाठी मदत करेल असे आवाहन करून सर्वांना शुभेच्छा दिल्या

अभिजीत गायकवाड छत्रपती शिवाजी महाराजांनबद्दल बोलताना म्हणाले की छत्रपती शिवराय हे सर्व धर्मसमभावी युगपुरुष होते. शत्रूंच्या पकडून आणलेले स्त्रियांना देखील ते सन्मानाने वागणूक देत असत व यथायोग्य सन्मानंतरच त्यांचा परतावा केला जात असे.हि संस्कृती जपणार्या अशा संवेदनशील व पराक्रमी योद्धास अभिवादन करणे हे आमचे परमकर्तव्य समजतो व दरवर्षी आम्ही हे उत्सव साजरे करत असतो असे अभिमानाने सांगितले या कार्यक्रमांमध्ये उपस्थित सर्व प्रशिक्षक महिला प्रशिक्षक यांचा देखील विशेष सन्मान करण्यात आला. सुरेश गायकवाड यांनी आभार मानले

# शिक्षण सेवकांना पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती द्यावी – बाबासाहेब बोडखे

## । 'शिक्षण सेवक योजना रद्द करा; तत्कालीन शासनाचा शब्द पाळा' शिक्षक परिषदेची मागणी । राज्य शासनाला शिक्षक परिषदेचे निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्यातील शिक्षण सेवक योजना रद्द करून शिक्षकांना थेट पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती देण्याचा निर्णय घेऊन तत्कालीन शासनाने दिलेला शब्द पाळावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा शिक्षक आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल तसेच शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंग यांना निवेदन पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच शंभर टक्के अनुदानित खाजगी शाळांमध्ये शासन निर्णय दि. १३ ऑक्टोबर २००० अन्वये शिक्षण सेवक योजना लागू करण्यात आली होती. या योजनेनुसार शिक्षक पदावर थेट पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती न देता तीन वर्षांच्या कालावधीसाठी 'शिक्षण सेवक' या नावरूपाने मानधनावर करार पद्धतीने नियुक्ती देण्याची व्यवस्था करण्यात आली.

त्या काळी राज्याची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्यामुळे शिक्षकांची रिक्त पदे त्वरित भरणे शासनाला शक्य नव्हते. मात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शिक्षण सेवक योजना तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात आली होती. राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर ही योजना संपुष्टात आणण्यात येईल, असे आश्वासन तत्कालीन शासनाने दिले होते, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. शिक्षक परिषदेच्या मते, लोकशाही पद्धतीने सत्तेवर येणाऱ्या शासनाने पूर्वीच्या शासनाने दिलेला शब्द पाळणे अत्यावश्यक आहे. अन्यथा शासनाच्या निर्णयांवरील विश्वासार्हता कमी होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. सध्याच्या परिस्थितीत राज्य शासन शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यास सक्षम आहे. त्यामुळे शिक्षण सेवक योजना रद्द करून शिक्षक पदांवर थेट पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती देण्याचा धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे शिक्षक परिषदेने म्हटले आहे.

हा विषय केवळ नियुक्तीचा नसून शिक्षकांच्या सन्मान आणि अस्मितेशी संबंधित आहे. शिक्षण सेवक म्हणून दीर्घकाळ काम करणाऱ्या शिक्षकांना योग्य न्याय मिळावा, यासाठी शासनाने या प्रश्नाकडे गंभीरपणे आणि सर्वंकषपणे पाहणे आवश्यक आहे. राज्य शासनाने शिक्षण सेवक योजना रद्द करून शिक्षकांना पूर्ण वेतनश्रेणीत नियुक्ती देण्याचा निर्णय जाहीर केल्यास शिक्षण क्षेत्राबाबत शासनाची सकारात्मक भूमिका स्पष्ट होईल. –बाबासाहेब बोडखे (जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद)

# रमजाननिमित्त हॉटेल अहमदनगर जायका मध्ये ग्रहाकांचा मोठा प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** करसेठजी रोड रामचंद्रखुंट येथे २०१५ पासुन आपल्या दर्जेदार व उत्कृष्ट स्वादिष्ट पदार्थामुळे नगर सह जिल्ह्याभरात नावाजलेले हॉटेल अहमदनगर ज़ायका मध्ये रमज़ान रोजा उपवासानिमित्त ग्राहकांचा मोठा वाढता प्रतिसाद पाहयला मिळत आहे. संध्याकाळच्या वेळेस रोज़ा इफ्तार साठी हॉटेल अहमदनगर ज़ायका येथे रोज़ादार बरोबरच नगर शहरातील खवय्यांची एकच गर्दी होत आहे.

हॉटेल अहमदनगर ज़ायका मध्ये फक्त चिकन चेच पदार्थ मिळतात.त्यामध्ये स्पेशल चिकन समोसा,




चिकन चिज़ बॉल, चिकन चिज़ पॉकेट, चिकन कटलेट,चिकन कंटक्की सोबतच अनेक चविष्ठ पदार्थ विक्रीस उपलब्ध असुन ग्राहकांच्या सेवेसाठी मोबाईल फोन वर पण ऑनलाइन ऑर्डर स्विकारण्यात येत आहे. नगरमधे सर्वात प्रथम चिकन समोसा सुरु करणारे हॉटेल अहमदनगर ज़ायका असुन ग्राहक नागरिकांनी एक वेळ हॉटेल अहमदनगर जायका ला भेट देऊन जीभेला चव आणणारे पदार्थ खाऊन पहावे नक्कीच आवडल्याशिवाय राहणार नाही. वारंवार परत येणारे आमचे समाधानी ग्राहक असुन रोजा उपवासानिमित्त सायंकाळी लवकरच हॉटेल अहमदनगर ज़ायका सुरु ठेवत असल्याचे प्रसिद्ध हॉटेल अहमदनगर जायकाचे मालक नईम सरदार यांनी सांगितले आहे.

# इंटिरियर डिझाईनर्स असोसिएशनतर्फे विविध खेळांच्या स्पर्धा संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** इंटिरियर डिझाईनर्स असोसिएशन, अहिल्यानगर संस्थेतर्फे प्रथमच घेण्यात आलेल्या ''आय डी ए ए चॅम्पियनस लीग २०२६'' ही स्पर्धा सावेडी येथील राजस्व टर्फ येथे आयोजित करण्यात आली होती, ३ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेमध्ये क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ, कॅरम व क्रिकेट या खेळांचा समावेश करण्यात आला होता, क्रिकेट मध्ये एकूण १२ संघांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये प्रत्येक संघामध्ये एक महिला खेळाडूचा समावेश असावा. अशी संस्थेतर्फे अट टाकण्यात आली.

या स्पर्धेकरिता श्री कालिका डोअर, जिडीडी मार्बल, स्लिज हार्डवेअर,श्री आनंद ट्रेडिंग कंपनी,श्री होम डेकोर, स्टेबल वर्ल्ड फर्निचर, आकोलकर आर्ट्स, अंबिका टाईल्स व ग्रेनाईट,अरिहंत प्लायवूड,श्री वर्धमान प्लायवूड, श्री दत्त मार्बल स्टोन कंपनी, एम स्टोन कंपनी या सर्वांनी संघांचे प्रतिनिधित्व केले, या सर्व स्पर्धेत एकूण १५० सभासदांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे उदघाटन अहिल्यानगरच्या महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर धनंजयभैय्या जाधव यांच्या हस्ते पार पडला, तसेच डॉ. हर्षवर्धन तनवर हे देखिल प्रमुख पाहुणे




म्हणून उपस्थित राहिले. संपूर्ण स्पर्धेला मुख्य प्रायोजक सम्राट इलेक्ट्रिकल्सचे संचालक दिनेश गोपलानी, सह प्रायोजक प्रथमेश लॅमिनेटस चे संचालक राकेश गांधी व आनंद सेल्सचे संचालक राहुल डुंगरवाल होते.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सागर कंदूर व पदाधिकारी सचिव व्रजेश शहा उपाध्यक्ष उमेश जाजू, अमोल खोले, विशाल दगडे, रोहित लोटके, कृणाल बुरगुल, अंकुर सुपेकर, राहुल बजाज, अमित कुकरेजा, घनश्याम पित्रोडा, सतिश बजाज आदी उपस्थित होते, स्वागत व प्रास्ताविक आय. डी.ए.ए.संस्थेचे अध्यक्ष सागर कंदूर यांनी केले. मुख्य प्रायोजकांच्या हस्ते महापौर व उपमहापौर यांचा सत्कार पार पडला व सहप्रायोजकांच्या हस्ते डॉ. हर्षवर्धन तनवर यांचा सत्कार करण्यात आला. महापौर व उपमहापौर यानी सर्व संस्थेच्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या व डॉ. हर्षवर्धन तनवर यांनी सर्व स्पर्धकांना उत्तम आरोग्याकरिता खेळाचे महत्व पटवून दिले व पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# आजची महिला मानसिक तणावाखाली जीवन जगत आहे – डॉ.वैशाली काकडे

## एकता कॉलेज मध्ये जागतिक महिला दिन साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आजची स्त्री प्रचंड मानसिक तणावाखाली असून तणावामुळे स्त्रीयांमध्ये विविध आजार उद्भवतात, महिलांना सर्व क्षेत्रात आरक्षण असले तरी मनमोकळेपणे त्यांना काम करता येत नाही कौटुंबिक जबाबदारी सांभाळून नोकरीच्या ठिकाणी काम करताना महिलांचा तणाव वाढताना दिसतो. असे प्रतिपादन डॉ.वैशाली काकडे यांनी केले.सावेडी उपनगरात तपोवन रोड येथील एकता महाविद्यालयात आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला यावेळी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ.निवृत्ती मिसाळ, उपप्राचार्य राजेंद्र मेहेत्रे, डॉ सलमान पठाण, दिपाली गिरी, मनोज क्षीरसागर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. काकडे म्हणाल्या की, स्त्री जरी शिकली, नोकरी करत असली तरी तिला कौटुंबिक जबाबदारी, ऑफिसचे कामकाज यामुळे कामाचा व्याप वाढत असून महिलांमध्ये तणाव निर्माण होत आहे. महिलांनी मोबाईल मध्ये रिल्स पाहण्यात जास्त वेळ घालवल्यामुळे त्यांना तणावमुक्त होण्यासाठी वेळ मिळत नाही. तसेच महिलांमध्ये थायरॉईड आजार देखील मोठ्या प्रमाणात दिसून येत असून महिलांनी याकडे वेळीच लक्ष देऊन उपचार केले पाहिजे. असे आवाहन त्यांनी केले.

उपप्राचार्य राजेंद्र मेहेत्रे यांनी आपल्या भाषणात सांगितले की महात्मा फुले व सावित्रीबाई यांच्यामुळे महिलांना शिक्षणाचे दारे खुली झाली आणि महिला आज विविध क्षेत्रात प्रगतीपथावर असून त्यांना सर्वत्र क्षेत्रात समान संधी उपलब्ध झाल्या आहेत.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.निवृत्ती मिसाळ यांनी महिलांचा सन्मान कशा प्रकारे वाढविता येईल याविषयी माहिती सांगितली.सावित्रीबाई फुले,राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर यांच्यामुळे महिलांना समाजात मानसन्मान व एक दिशा मिळाली. भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सध्याच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, कल्पना चावला इ. महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.असे डॉ.मिसाळ म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनोज क्षीरसागर यांनी केले. प्रास्ताविक प्रा.चेतना आदमाने यांनी केले. तर आभार प्रा. कविता वाकडे यांनी मानले.

(पान १ वरून)

### रामनवमी मिरवणुकीसाठी रात्री बारा वाजेपर्यंतची परवानगी द्यावी

कार्यकर्त्यांनी केली आहे. दरम्यान आज सकल हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन रात्री १२:०० वाजेपर्यंत मिरवणुकीला परवानगी देण्यात यावी अशी मागण कल हिंदुत्ववादी श्रीराम भक्त कार्यकत्यानी जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देऊन केली आहे की नगर शहरामध्ये २०१५ पासून आम्ही रामनवमी उत्सव साजरा करतो. त्या उत्सवाला आता दिवसेंदिवस एक मोठं असं स्वरूप येत चाललेल आहे. त्यामुळं आम्हाला रात्री १२ वाजेपर्यंत वेळ देण्यात यावी. शासनाने जे १५ दिवस दिलेले आहेत वेळ वाढून द्यायाचे तर त्यातले १३ दिवस त्यांनी विविध सन उत्सवांना दिलेले आहेत परंतु अजून दोन दिवस शिल्लक आहेत तर त्यातला एक दिवस रामनवमी उत्सवासाठी देण्यात यावा कारण रामनवमी जी आहे ती उन्हाळ्यामध्ये येत असते. मिरवणूक सुरू होता दिवसभर ऊन असल्यामुळं संध्याकाळी सहा वाजता उशिरा मिरवणूक सुरू होते आणि १० वाजता लगेच बंद केली जाते. त्यामुळे जो आम्ही जी शोभा यात्रा काढतो ती लोकांपर्यंत पोहोचत नाही किंवा लोकांना पाहता येत नाही तर ती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने मागणी केलेली आहे की रात्री १२ वाजेपर्यंत शोभा यात्रेसाठी परवानगी देण्यात यावी अशाच प्रकारची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे देखील केलेली आहे

### वकिलांनी दाव्यांचा सखोल अभ्यास करून नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा – धर्मादाय उपआयुक्त एन. व्ही. जगताप

न्यायाधीशांचे काम आहे. आपल्या अशिलाचा दावा कोणत्या कायद्यांतर्गत बसतो आणि त्याला न्याय मिळवून देण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला आणि महाविद्यालयाची होत असलेली प्रगती याबाबत माहिती दिली. या कार्यशाळेत राज्यभरातून एकूण २६२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

कार्यशाळेत नगरचे नामवंत विधिज्ञ ॲड. विवेक म्हसे, ॲड. सतीश गुगळे आणि ॲड. विवेक मापारी यांनी विद्यार्थ्यांना कायद्याच्या मूलभूत संकल्पना, खटल्यापूर्व तयारी तसेच कनिष्ठ न्यायालयांच्या कार्यपद्धतीबाबत सखोल मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथींची ओळख प्रा. अतुल म्हस्के यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे व प्रा. प्रियंका खुळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. अतुल मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### शहर विकासाच्या निर्णयांसाठी सुसज्ज सभागृहाची गरज – उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

दत्ता गाडळकर, गोरख पडोळे, जितू गंभीर तसेच शहर अभियंता मनोज पारखे आदी पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, सध्या सभागृहाची अवस्था अत्यंत बिकट असून त्याचे काम तातडीने मार्गी लागणे गरजेचे आहे. चांगल्या आणि सुसज्ज सभागृहातून सकारात्मक चर्चा घडून येते आणि त्यातून शहर विकासाची कामे गती घेतात. त्यामुळे अहिल्यानगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह सुस्थितीत असणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, सभागृहामध्ये अनेक ठिकाणी लाईटच्या वायर खाली लोंबकळलेल्या दिसतात. काही ठिकाणी लाईटची व्यवस्था नाही तर कधी कधी माइकचाही आवाज येत नाही. महासभा सुरू असताना या कारणांमुळे अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे महापालिकेचे सभागृह सुसज्ज आणि व्यवस्थित असावे, यासाठी प्रशासनाने तातडीने पुढील कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली.

### महामंडळ म्हणजे पत्रकारांसाठी चॉकलेट

जवळपास ७० आर्थिक विकास महामंडळं आहेत, ही महामंडळं म्हणजे पांढरे हत्ती आहेत. या महामंडळाच्या माध्यमातून एकाही समाजघटकाचा विकास झालेला नाही.. निधीचा अभाव आणि सरकारची उदासिनता यामुळे बहुतेक महामंडळं मृत्यूशय्येवर असल्याने ही व्यवस्था कुचकामी ठरली आहे.. अशा स्थितीत पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करून पत्रकारांचे कोणतेही प्रश्न सुटणार नाहीत असे स्पष्ट मत एस.एम.देशमुख यांनी व्यक्त केले आहे.. काही पत्रकारांची सोय लावण्यासाठीच या महामंडळाचा आग्रह धरला जात असल्याची टीकाही एस.एम.देशमुख यांनी केली आहे.

पत्रकारांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी देशपातळीवर सुप्रिम कोर्टाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया ही वैधानिक व्यवस्था कार्यरत आहे.. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात हायकोर्टाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एक सक्षम वैधानिक व्यवस्था उभी केली जावी अशी मागणीही एस.एम. देशमुख यांनी केली आहे..

सरकारची इच्छाशक्ती असेल तर पत्रकार पेन्शन, पत्रकार आरोग्य, गृहनिर्माण, पत्रकार संरक्षण कायदा , अधिस्विकृतीचे प्रश्न, वेतन आयोगाची अंमलबजावणी हे सारे विषय एका बैठकीत मार्गी लागू शकतात, त्यासाठी महामंडळाची गरज नाही. मात्र पत्रकारांचे प्रश्न सुटावेत असे सरकारलाच वाटत नाही. बघा, पत्रकार पेन्शन योजनेसाठी जी समिती आहे, त्याची बैठक दीड वर्षांपासून झालेलीच नाही, पत्रकार संरक्षण कायदा झाला पण पण ८ वर्षांपासून त्याचे नोटिफिकेशन काढले गेले नसल्याने कायदयाची राज्यात अंमलबजावणी होत नाही, पत्रकारासाठीच्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करा असा सुप्रिम कोर्टाचा आदेश असतानाही सरकार काही करीत नाही, केवळ महामंडळ स्थापन करून सरकारच्या भूमिकेत फार फरक पडेल असे वाटत नाही, फक्त काही पत्रकारांची सोय लावण्यासाठी सरकारने महामंडळाचे चॉकलेट पत्रकारांना देऊ केले आहे असा आरोपही एस.एम.देशमुख यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केला आहे..

या संदर्भात प्रमुख दैनिकाचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार, प्रमुख पत्रकार संघटनांचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा करूनच सरकारने या संदर्भात निर्णय घ्यावा अशी आग्रही मागणीही एस.एम.देशमुख यांनी केली आहे.